## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE

Mahatma Gandhi Vidyamandir's

## Samajshree Prashantdada Hiray Arts, Science & Commerce College Nampur, Nashik

# "Contribution of Freedom Fighters of Baglan Talukas in Indian Freedom Movement"

# "भारतीय स्वातंत्र्य अदोलनात बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान"

## DEPARTMENT OF HISTORY
## BEST PRACTICE


**Supervisor**

**Professor. Sanjay T. Shelar**

**Mr. Jeetendra D. Pagar**


**2017–18 to 2022-23**

# मनोगत

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नामपुर ता. बागलाण जि. नाशिक इतिहास विभागअंतर्गत नामपुर परिसर तसेच बागलाण तालुक्यातील भारतीय स्वातंत्र्य संग्रामात १८५४-१९५० याकालावधीत स्वातंत्र्यवीरांनी सहभाग घेऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठी महात्मा गांधींच्या राष्ट्रीय चळवळीत सहभाग घेऊन देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले, अशा स्वातंत्र्यवीरांची माहिती आजच्या तरुण पिढीला अवगत व्हावी, तसेच स्वातंत्र्यवीरांचे कार्य आजच्या तरुण पिढीला ज्ञात व्हावे या उद्देशाने महाविद्यालयातील इतिहास विभागाने हा उपक्रम राबवला.

आमच्या महाविद्यालयाने स्वातंत्र्यसंग्रामातील स्वातंत्र्यवीरांच्या कामाचे संकलन करण्याचा निर्धार करून महाविद्यालयातील इतिहास विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी स्वातंत्र्यवीरांच्या कार्याची माहिती मिळवली. तसेच इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी माहिती संकलित करून महाविद्यालयास प्राप्त करून दिली व महाविद्यालयातील प्राध्यापकांनी ती माहिती एकत्र करून एक अभिनव उपक्रम तयार केला.

प्राचार्य

डॉ. दिनेश शिरुडे

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| 1. | मुरलीधर लक्ष्मण बिरारी यांचे समाजकार्य व स्वातंत्र्य चळवळीतील योगदान- कापडणीस राहुल संदीप तृतीय वर्ष कला | ०१ |
| 2. | बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्यसंग्रामातील एक सुवर्णपान म्हणजे पठावे जंगल सत्याग्रह- समाधान मोहिते द्वितीय वर्ष कला इतिहास | ०२ |
| 3. | मोसम खोऱ्यातील भीलवाडचा जंगल सत्याग्रह- कुं. बादल तुकाराम जाधव प्रथम वर्ष कला | ०५ |
| 4. | सविनय कायदेभंग चळवळीतील बागलाणचे योगदान- कुं. किरण खैरनार -द्वितीय वर्ष कला | ०७ |
| 5. | भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील बाबा नरहर गोपाल शेठ यांची योगदान- पवार मंगेश एकनाथ तृतीय वर्ष कला | ०९ |
| 6. | बागलाण तालुक्यातील अग्रगण्य स्वातंत्र्य सैनिक कै. केशवराव उर्फ गणपत भिका खुटाडे- खैरनार आकाश जिभाऊ द्वितीय वर्ष कला | ११ |
| 7. | बागलांची प्रेरणा बागलाणरत्न स्वातंत्र्य सैनिक कै. फुला शिवराम कापडणीस | १३ |
| 8. | गंगाधर गणपत खुटाडे- अहिरे योगिता रवींद्र तृतीय वर्ष कला | १५ |
| 9. | मुरलीधर लक्ष्मण बिरारी यांचे समाजकार्य व स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | १७ |
| 10. | बागलांचे बाबा स्वातंत्र्यलढ्यातील समर्पित व्यक्तीमत्त्व | १९ |
| 11. | श्री.नारायण वेडू अहिरे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील कार्य | २२ |
| 12. | बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे सन्मानपत्र | |
| 13. | बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे छायाचित्र | |

| | | |
|---|---|---|
| **14.** | बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे पदक | |
| **15.** | बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचेइतर कागदपत्र | |
| **16.** | बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांची यादी | |

# मुरलीधर लक्ष्मण बिरारी यांचे समाजकार्य व स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

कापडणीस राहुल संदीप तृतीय वर्ष कला

स्वातंत्र्यवीर मुरलीधर लक्ष्मण बिरारी यांचा जन्म १८ मे १९६५ साली झाला.त्यांच्या वडिलांचे नाव लक्ष्मण शेठ असे होते. तर आईचे नाव तुळसाबाई असे होते. मुरलीधर यांना दोन भाऊ होते. रघुनाथ तात्या आणि जगन्नाथ तात्या असे त्यांच्या भावांचे नाव होते. मुरलीधर यांना सर्वजण बाबा या टोपण नावाने हाक मारत असत. मुरलीधर यांचा विवाह बहादुरपूर येथील लोटन सेट पांडू बोरसे यांची लाडकी कन्या गंगुबाई यांच्याशी झाला. वैवाहिक जीवन जगत असताना त्यांच्या वडिलांचे म्हणजेच लक्ष्मण बिरारी यांचा मृत्यू झाला. त्यामुळे कुटुंबातील सर्व जबाबदारी ही बाबांवर आली होती बाबांनी ती जबाबदारी पार पाडली हे सर्व करत असताना त्यांनी समाजकार्य करण्याचे ठरवले बाबांनी पुढे एक संकल्प केला की कुटुंब किंवा माझे घर हे विश्वही संकल्पना मर्यादित न ठेवता आपण ज्या समाजात मायभूमी देशात जन्माला आलेलो आहोत त्यांचे आपण काहीतरी देणे लागतो या उद्देशाने बाबा समाजकार्याला लागले.

समाजकार्याची सुरुवात आसखेडा गावातूनच केली. गावकल्याणासाठी त्यांनी सरपंच म्हणून निवड केली व त्यांनी सलग सोळा वर्षे सरपंच म्हणून काम सांभाळले व त्यांचा गावाच्या विकासात मोलाचा वाटा होता.गावात रस्ते मंदिरे मोसम नदीवरील दगडी घाट त्याचबरोबर १९४८ साली बाबांनी आसखेडा गावात बस सेवा सुरू केली. त्यामुळे दळणवळणाची सेवा सुरू झाली. बाबांचं काम हे समाजकार्यापर्यंत थांबत नाही तर ते पुढे कीर्तनाच्या आणि भजनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करत असतानाच त्यांची प्रतिमा शक्ती जागृत झाली आणि त्यातूनच काव्य लेखनाला सुरुवात झाली. त्यांनी काकड आरती आणि श्रीकृष्णाची आरती देखील लिहिली त्यांच्या या सहज सुलभ काव्य लेखनाच्या छंदामुळे ते घोडकवी म्हणून ओळखले जाऊ लागले जीवनाचे बारीक बारीक रंगांचे

दर्शन घडवणारी त्यांची कविता व मनाला स्पर्श जाणवणारी त्यांची २४० पेक्षा जास्त काव्य लेखन झालेले आहे. काव्याच्या माध्यमातून समाजाला एक उपदेश केला आहे दरबारी त्यांच्या म्हणे सर्वांसाठी त्यास आहे माणसात देव नाही म्हणतात मग दगडात काय बाबांना कर्मकांड अंधश्रद्धेवर विश्वास नव्हता मनुष्य प्राण्यातच देव पाहण्यात त्यांची हेतू होता. त्यांच्या मतानुसार मानवधर्म हाच खरा धर्म आहे .

समाज कार्य करत असतानाच त्यांच्या मनात देश कार्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे म्हणून बाबांनी जननी व जन्मभूमी यांना सर्वश्रेष्ठ स्थानी मानून बाबांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली.इ.स.1930 मध्ये बाबांनी महात्मा गांधींच्या जीवनावर गाणी लिहून त्यांच्याप्रती गावोगावी जाऊन वाटल्या आणि ब्रिटिशांच्या विरोधात प्रतिभेच्या जोरावर जनतेच्या मनामध्ये जनजागृतीचे काम करत असताना ब्रिटिशांनी बाबांना पकडून त्यांच्या काव्याच्या प्रति जप्त करून त्यांना पुण्याच्या येरवडा तुरुंगात चार महिन्याची शिक्षा ठोठावली. शिक्षा बघून परत आल्यानंतर त्यांनी देशसेवेचे कार्य अविरत सुरू ठेवले. अशा या थोर स्वातंत्र्यसैनिकाचा मृत्यू ९ जून १९७८ साली झाला. त्यांचे साहित्य कार्य विचार आजही अजरामर आहेत.

## “बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्यसंग्रामातील एक सुवर्णपान म्हणजे पठावे जंगल सत्याग्रह”

समाधान मोहिते  द्वितीय वर्ष कला इतिहास

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही ऐतिहासिक घटनांची मालिका होती.ज्याचा अंतिम उद्देश म्हणजे भारतातील ब्रिटिश राजवट संपवणे हा होता.हा स्वातंत्र्यलढा १९५७ ते १९४७ या काळात चालला भारतीय स्वातंत्र्यासाठी पहिली क्रांतिकारी चळवळ बंगालमधून उदयास आली हळूहळू ती संपूर्ण भारतात पसरू लागली.

राष्ट्रपिता गांधीजींनी लोकमान्य टिळका नंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा लढा चालू ठेवला तो अधिक तीव्रही केला.अहिंसक मार्गाने भारतातील कानाकोपऱ्यात स्वातंत्र्यासंबंधी जनजागरण त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवली भारतात ब्रिटिशांच्या विरोधात असहकार व संवेदन कायदेभंगाची चळवळ गांधीजींनी सुरू केली.त्यात त्यांनी ब्रिटिशांना कायदा मानायचा नाही असा संदेश दिला.त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीचा एक भाग म्हणून गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला.समुद्राकाठी भरपूर मीठ पिकते ते मीठ प्रत्येक माणसाचे अत्यावश्यक गरज आहे.असे असताना ब्रिटिश सरकारने कर बसविला त्यात समुद्र आमचा समुद्रकाठच्या जमिनी आमच्या त्यात मीठ आमचं आणि त्यावर कर ब्रिटिश सरकारचे म्हणून तो कर अन्यायकारक आहे व त्या त्याच्या विरोधात सत्याग्रह करण्याचा निर्णय गांधीजींनी घेतला.विलेपार्ले येथे जो मिठाचा सत्याग्रह झाला त्यात सत्याग्रहासाठी बंगालतील मंडळी मोठ्या उत्साहाने आणि स्वातंत्र्य प्रेमाने गेले होते.नाशिकहून जी पहिली तुकडी मिठाच्या सत्याग्रहासाठी बंगालमधील मंडळी व मोठ्या प्रमाणात नाशिकहून पहिली तुकडी सामील झाली त्यात संपूर्ण देवचंद भिकाजी पाटील हे पहिले सत्याग्रही होते मीठ च्या सत्याग्रहासाठी नामपुर संपूर्ण उत्तराने, टेंभे, चिराई, पिंपळकोठे ,ताराबाद इत्यादी गावातून स्वयंसेवक संग्रामासाठी गेले यात २७ लोकांपैकी काही लोक परस्पर शिरोडा येथे मिठाच्या सत्याग्रह घेण्यासाठी गेले आणि यातून नामपुर मध्ये झेंडा सत्याग्रहाची स्मृती मिळाली.ज्या लोकांना मिठाच्या सत्याग्रह करणे शक्य नाही जे लोक समुद्र किनाऱ्यापासून लांब आहेत त्यांनी अन्य प्रकारचे कायदेमंग करायचे अहिंसात्मक सत्याग्रह करायचे असा संदेश गांधीजींनी दिला म्हणून बांगलांमध्ये अन्य सत्य करावे असे कार्यकर्त्यांनी करावे असे ठरवले यात बांगलाणंमध्ये दोन ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले भिलवाड मांगीतुंगीचे जंगल सत्याग्रह त्यात खूप गाजला.त्यात २४ मार्च १९३० रोजी पहिली बैठक पार पडली त्यात बैठकीत नरहरी शेठ प्रामुख्याने उपस्थित होते सत्याग्रहासाठी नाशिकहून दादासाहेब गर्दे वकील आले होते हा

सत्याग्रह ८ ऑगस्ट १९४२ रोजी झाला त्यानंतर पठाडे येथील जंगल सत्याग्रह मोसम खोऱ्यातील होता तो सर्वात मोठा सत्याग्रह करण्यात आला.

आमच्या देशाच्या संपत्तीवर आणि निसर्ग संपत्तीवर आमचा हक्क नाही ही गोष्ट मुळी अन्याय करणारी होती.जंगले आमची त्यात जंगलातील गवत आमचं असतानाही त्या जंगलात आमची गाई गुरे मेंढ्या शेळ्या चरू शकत नव्हत्या.ब्रिटिश सरकारने वनचरायचा कायदा केला प्रत्येक शेतकऱ्याला वनचरे भरावी लागत असे एवढं करूनही जंगलावर जनावरांना जंगलात गेल्यावर ब्रिटिश अधिकारी जनावरांना कोंडवाडा दाखवत असे कोंडवाड्यातून जनावर सोडून घ्यायची त्या काळात जबरदस्त फी किंवा दंड भरावी लागेल या लोकांनी सत्याग्रह सुरू केला तर ब्रिटिशांनी कोंडलेल्या जनावरांचा निलाव जाहीर करत पण हा निलाव घेण्याची कोणी जात नसे कोंडवाडा नको या भावनेने कोणवाडे फोडण्याची म्हणून निघाली सुरुवातीला काही कृष्णा वेळू पाटील या स्वातंत्र्य सैनिकांनी प्रथम कोंडवाडा फोडण्याची चळवळीत भाग घेतला.अशाप्रकारे एका चळवळीच्या पोटात दुसरी चव्हाण दडलेली असेल या सर्व चळवळी कायदेभंगाची चळवळ या मुख्य चळवळीच्या भाग म्हणून जन्माला आल्या.

भीलवाडा चा जंगल सत्याग्रह झाला आणि त्यानंतर पठार येथेही जंगल सत्याग्रह झाला असाच जंगल कळवण तालुक्याती चणकापूर येथेही झाला होता .जंगल सत्याग्रहाचे वातावरण निर्मितीसाठी सभा बैठका प्रभात फेऱ्या इत्यादी आयोजन केले जाईल .कार्यकर्ते खेड्यापाड्यात जात स्वतःच्या प्रपंचाची आणि स्वार्थाची त्यांना फारसे चिंता नसेल देशाचा संचार हाच त्यांचा संसार झाला होता .पटावे येथील जंगल सत्याग्रहासाठी आराम खोऱ्यातील गावांचा विषय सहभाग होता नाशिकहून पंडित सिताराम शास्त्री यांची नियुक्ती झाली .मंत सिताराम शास्त्री यांच्या जवळ एक मोठी काठी असे ते फार जोश पूर्ण भाषण करायचे भोजनासाठी त्यांना पिठले भात लागायचे सारावाडी च्या चळवळीत पासून ते बागलाण मध्येच राहिले

अनेकांना त्यांनी स्वातंत्र्याचे कार्य करण्याची प्रेरणा दिली.१९३० नंतर वृद्धा अवस्थेत त्यांनी बागलाण मध्ये प्राण सोडला.पठावे येथे जंगल सत्याग्रह कोठे करायचा याची जागा निश्चित करण्यात आली सत्याग्रही नी दोन दिवसाची भाकरी बरोबर घेतल्या प्रत्येकाने एक  विळा घेतलाविळ्याने जंगलातले गवत कापून त्या सत्याग्रह करायचा होता.समुद्रकाठी मुठभर मीठ उचलायचे आणि देशातील जुडी भर गवत कापायचे असा गांधीजींचा अहिंसात्मक सत्याग्रह होता.मंत सिताराम शास्त्रींबरोबर सटाणाहून शेवाळे वकील तुंबडू भाऊसाहेब ठेंगोडेकर काळू ,तानाजी पाटील व अन्य कितीतरी कार्यकर्ते या सत्याग्रहासाठी सहभागी होते की किकवारी तळवाडे येथील आणि पटाव्याच्या रस्त्यावरील सर्व गावातील कमी अधिक लोक या सहभागी होते या स्वातंत्र्यसैनिकांच्या मुखात “लेंगे लेंगे चरखा चलाके स्वराज्य लेंगे” “ महात्मा गांधी की जय” यासारख्या घोषणा होत्या गर्जना करत आदिवासी बंधूंच्या ढोलपाई ढोल याच्या वाद्यांच्या तालावर मंडळी पटवे या गावाकडे निघाली रस्त्यावर गावात त्यांचे स्वागत होईल प्रत्येकाच्या डोक्यावर पांढरी गांधी टोपी होती खादीचे झाडे भरडे कपडे त्यांनी घातले होते काही गावातून भाकरी गोळा करून आणल्या होत्या सत्याग्रहींना भाकरी कमी पडू नयेत ही त्या मागची भावना होती दुपारी सर्व मंडळी पटावे येथे जमा झाली ब्रिटिश अधिकारी फौजदारे हवालदार या सत्याग्रहींना विरोध कसा करायचा याचा विचार करीत होते काही ब्रिटिशा अधिकारी जे भारतीय होते ते मनातून सत्याग्रह बाजूचेच होते नोकरीमुळे ते अगणित होते सत्याग्रहींची रानपाण्यासाठी मुले माता-भगिनी यांनी रस्त्यावर गर्दी केली होती मोठे विलोभनीय दृश्य होते.

पठावे विभागाच्या बिल वस्ती पासून हे सत्याग्रह यात्रा जंगलाकडे निघाली सत्याग्रहांच्या हातात तिरंगी झेंडे होते.मिरवणुकीच्या सुरुवात करण्याआधी मंत सिताराम शास्त्री यांनी गायीची पूजा केली होती प्राणीसृष्टी व वन सृष्टीतील हीच भारतीय संस्कृतीची जोडले गेले आहे.त्यावेळी पटावे गावातील पोलीस पाटील भिवा जत्रू पवार हे होते सुमारे दहा हजार पेक्षा अधिक सत्याग्रही जमले होते भीलवाडा

सत्याग्रहाच्या तुलनेने ही संख्या मोठी थोडी कमी होती.या सर्व जमावला विरोध करायचे अवघे सात-आठ पोलीस होते.या ठिकाणी सत्याग्रह करायचा होता तेथे सत्याग्रही पोहोचले नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांनी भाषण केले सत्याग्रहा मागची भूमिका विशद करून सांगितली.स्वातंत्र्य मिळेपर्यंत आमचा लढा पूज्य गांधीजींच्या आदेशाप्रमाणे चालू राहील असा निर्धार व्यक्त करण्यात आला त्याचवेळी रानात घुसण्यासाठी रामा गंगाराम गांगुर्डे राहणार सावरपाडा यांनी शेळ्या आणल्या होत्या .शेळ्या जंगलात करू लागल्या मंत सिताराम शास्त्री यांनी हातात चांदीचा छोटा विळा घेतला मुठभर गवत कापून पेंडी बांधली ही पेंडी एका दांडीला बांधून पेंडीचेच निशान केले प्रत्येक सत्याग्रहीने थोडे थोडे गवत कापले प्रत्येकाने एक पेंडी आपल्या हातात घेतली पेंड्यांचे निशाणी करून मंडळी" भारत माता की जय महात्मा गांधी "की जय मनत आपापल्या घराकडे परतली प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्रसन्नता ओसंडून निघत होती.एवढ्या सर्व सत्याग्रहांपैकी कोणालाही अटक झाली नाही पोलिसांनीही हे भव्य दिव्य दर्शन घेऊन मनातून आनंद वाटत होता ते आपले समाधान त्यांनी चेहरावरता दाखवता येत नव्हते.

पठावे येथे आणि भीलवाडा येथे ज्या ठिकाण स्वातंत्र काळात जंगल सत्याग्रह झाले ते ठिकाणे पवित्र स्थान आहेत .या ठिकाणी स्वातंत्र्याचे स्मारके उभे करणे आवश्यक आहेत .स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाली स्वातंत्र्याचे सुवर्ण महोत्सव साजरा झाला आहे. नेत्यांचे ठिकठिकाणी भाषण केली त्यांना एवढे महत्त्वाचे काम केले तर तर आपण या सुवर्ण महोत्सवी वर्ष स्वातंत्र्यसैनिकांच्या ऋणातून अल्पशाने मुक्त होऊ शकू आवश्यक ते स्मारके उभे करून आपण आपल्या पुढच्या पिढींना प्रेरणास्थाने आणि इतिहासाची पाने उपलब्ध करून देण्यासाठी तरी एकत्र येऊन इतिहासाचे दर्शन घडवूया.

# मोसम खोऱ्यातील भीलवाडचा जंगल सत्याग्रह

कुं. बादल तुकाराम जाधव (प्रथम वर्ष कला)

महात्मा गांधींच्या चळवळींनी भारतीय जनतेवर जबरदस्त प्रभाव पडत होता, त्याकाळी असहकारितेची , कायदेभंगाची चळवळ भारतभर पसरत होत्या खेड्याकडे चला ही मोहीम देखील मूळ धरीत होती, अशावेळी बागलानात काही चळवळी निर्माण झाल्या या चळवळींनी इतिहासाने बागलांचे नाव इतिहासात अजरामर झाले या चळवळी बागलानपुरत्या मर्यादित होत्या पण त्यांच्या मुळाशी जनतेच्या ज्या तीव्र भावना घडल्या होत्या त्या अविश्वसनीय व अ वर्णनीय होत्या, बागलानात ज्या चळवळी उठल्या त्या म्हणजे सारावाडीची चळवळ आणि जंगल सत्याग्रह या होत. लोकसहभागामुळे या दोन्ही चळवळींनी तालुका भारावून गेला होता जंगल सत्याग्रहां पैकी एक महत्त्वाचा जंगल सत्याग्रह म्हणजे भिलवाडचा जंगल सत्याग्रह होय, जैन तीर्थक्षेत्र श्री मांगीतुंगी जिंचे देव डोंगर यांच्या पायथ्याशी भिलवाड येथे ८ ऑगस्ट १९३० रोजी मोठा जंगल सत्याग्रह झाला, भीलवाडा चा सत्याग्रह हा मोसम खोऱ्यातील जंगल सत्याग्रह होता.

बागलानात मोठा दुष्काळ पडला होता आवर्षणामुळे सर्व पिके गेली या काळात बागलांची परिस्थिती अतिशय बिकट झाली जंगलात चारा नव्हता, घरांमध्ये धान्य नव्हती, अशा परिस्थितीत इंग्रज सरकारचे अधिकारी कुर्णांमध्ये गुरांना प्रवेश देत नव्हते, वनचराईस वसुलीची सक्ती करीत होते, एखाद्याला समजा वन चराई न भरल्यास दंड आकारित होते, शक्तीने वसुली करीत होते त्यामुळे इंग्रज सरकार विरुद्ध जनतेच्या मनात संताप निर्माण होत होता लोक संघटित होत होते ब्रिटिश सरकारला विरोध करण्याची हिम्मत जनतेमध्ये निर्माण होऊ लागली, लोकांमध्ये सहकाराची वृत्ती निर्माण होऊ लागली, त्यातूनच पुढे इंग्रज सरकारचे कायदे पाळायचे नाहीत असे लोकांनी ठरविले त्यानंतर लोकांनी जंगल सत्याग्रहासाठी लोकमत तयार करण्यासाठी जनतेला त्यांच्या हक्काचे

जाणीव करून देण्यासाठी ठिकठिकाणी सभा आयोजित करण्याचा निर्णय गुप्त बैठकीत घेण्यात येऊ लागले त्यातूनच जंगल सत्याग्रहाची माहिती देण्यात येऊ लागली, जंगल सत्याग्रह म्हणजे केवळ जंगलातील झाडे तोडणे नाही इंग्रज सरकारची कोणत्याही प्रकारची अनुमती न घेता केवळ गवत कापणी नाही, तर इंग्रज शासनाचे कायदे मोडण्याचे विरोध दर्शवून स्वातंत्र्याची मागणी करण्याची कृती आहे असे स्पष्ट करण्यात आले.

जंगल सत्याग्रह हा स्वातंत्र्याचा लढा आहे असे सभेतून लोकांना सांगण्यात आले यासाठी सटाणा, नामपुर, सोमपूर, अजमेर सौंदाणे, भीलवाड अशा अनेक गावांमध्ये सभा घेण्यात आल्या. भिलवाड येथे सत्याग्रह करण्यासंबंधीची तयारी त्याआधी दोन ते चार महिन्यांपासून सुरू होती जंगल सत्याग्रहाची नियोजन फारच पद्धतशीरपणे करण्यात आले होते, नाशिक जिल्ह्यातून अनेक स्वातंत्र सैनिकांनी सहभाग घेतला होता बिलवाडच्या जंगलातील जंगल सभा सत्याग्रहांच्या प्रारंभ झाडावर कुराडीच्या घाव घालून करायचे ठरवले होते, त्यासाठी चांदीची कुराड तयार करण्यात आली होती जंगलातील गवत कापण्यासाठी चांदीचा विळा तयार करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासाहेब गंद्रे वकील हे होते, त्यांनी चांदीच्या कुऱ्हाडीने झाडावर घाव घातला आणि हे जंगल इंग्रज सरकारचे नसून आमचे आहे असे प्रतीकात्मक पद्धतीने दाखवले, त्याचप्रमाणे चांदीच्या विळ्याने तेथील मुठभर गवत कापले आणि त्यावर खरा हक्क जनतेचा आहे हे दाखवले. अगदी दुष्काळाच्या काळातही जंगलात जनावरांना चरू दिले जात नव्हते झाडाला पाला तोडून जनावरांना देण्यास मनाई होती, ब्रिटिश सरकारने वनचरे लागली होती या सगळ्या अन्यायाविरुद्ध हा लढा होता, जुलमी राजवटी विरुद्ध लढा देण्यासाठी हा सत्याग्रह होता बिलवारचा जंगल सत्याग्रह ही एक ऐतिहासिक घटना होती इंग्रजांची संघर्ष सुरू करण्याची ती एक नांदी होती. लोक शक्तीचे ते विराट रूप होते म्हणूनच भिलवाडा चा जंगल सत्याग्रह चालू असताना **"भारत माता की जय"** **"महात्मा गांधीजी की जय"** **"ब्रिटिश शाही मुर्दाबाद"** अशा घोषणा दिल्या जात होत्या, या

घोषणांमुळे सर्वीकडे दणाणून गेले होते. महात्मा गांधीजींच्या मतानुसार खेड्यातील जनशक्ती जागी झाल्याचा तो एक साक्षात्कार होता. बागलांसारख्या भारतातील एक छोट्या भागातील दूर जंगलात जनतेच्या सत्तेच्या, आग्रहांचा- सत्याग्रहांचा तो एक वस्तू पाठ होता. ५० हजारांचा वर जमलेल्या लोकांच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षिणेने इंग्रज शासनाची प्रत्यक्ष संघर्ष सुरू झाल्याची ती एक खूण होती. अशाप्रकारे ८ऑगस्ट १९३० रोजी मोसम खोऱ्यातील भिलवाडचा जंगल सत्याग्रह यशस्वी घडवून आणण्यात आला, यामध्ये अनेक लोकांनी सहभाग घेतला या सर्व सहभागी क्रांतिवीर लोकांना माझा मानाचा मुजरा..

# सविनय कायदेभंग चळवळीतील बागलाणचे योगदान

कुं. किरण खैरनार (द्वितीय वर्ष कला)

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढण्यासाठी विविध चळवळी व आंदोलने उभी केली. संविनय कायदेभंग चळवळीची सुरुवात १९३० मध्ये झाली. या चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे होते. या चळवळीत कायदेभंग जनतेकडून केले जात होते. ब्रिटिशांनी केलेले जाचक कायदे मोडणे, त्या कायद्यांचा भंग करणे, विरोध करणे हे मुख्य उद्दिष्टे या चळवळीचे होते. ही चळवळ अतिशय व्यापक स्वरूपाची होती. भारताच्या अनेक भागामध्ये पसरलेली होती.

बागलाणमध्ये कायदेभंग चळवळीची सुरुवात जंगल सत्याग्रह पासून सुरु झाली आणि ही चळवळ बागलाण तालुक्यातून नामपूर या गावापासून सुरु झाली. श्री.गद्रे वकील यांच्या नेतुत्वाखाली एक मोठी सभा नामपूर येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये साधारणतः ८ ते १० हजार लोकांनी सहभाग घेतला होता. या सभेला खेड्यापाड्यातून लोक येत होते. आदिवासी लोकांची वाद्य गावात वाजविली जात आणि गावागावातून या वाद्यांच्या तालावर घोषणा देत लोक नामपूरला येत होती. जंगल सत्याग्रह ही चळवळ संपूर्ण बागलाणच्या परिसरात पसरली. विविध ठिकाणी सभा होत होत्या. या सभांमधून शंकरराव शेवाळे, महंत सीताराम शास्त्री, शंकर बाबाजी पोतदार, काळू नानाजी पाटील, गोविंदराव देशपांडे यांची भाषणे होत होती ही भाषणे ऐकून लोक अतिशय भारावून जात होते. यात आणखी या चळवळीचे एक विशेष म्हणजे महिला वर्गही या चळवळीत सहभागी झाल्या होत्या. नामपूर येथे १९३० साली या संदर्भात महिला परिषद भरवण्यात आली होती. डॉ.धडफळे या परिषदेचे अध्यक्ष होते. ज्या प्रमाणे राष्ट्रीय पातळीवर संविनय कायदेभंग चळवळीत डॉ.सरोजिनी नायडू काम करीत होत्या त्यांच्या प्रेरणेतून बागलाण तालुक्यात महिलांचे सत्याग्रहचे काम सुरु झाले. टेंभे या गावातील अनेक महिला या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाल्या होत्या. संविनय कायदेभंग

चळवळीच्या धर्तीवर जंगल सत्याग्रह करण्याचे ठरविले. बागलाण तालुक्यातील आदिवासी भागात या चळवळीची वातावरण निर्मिती करण्यात आली. जंगल सत्याग्रह हा सारावाढ चळवळीचा एक भाग होता. बागलाणमध्ये दोन ठिकाणी सत्याग्रह झाले एक भिलवाड सत्याग्रह आणि दुसरा पठावे येथील सत्याग्रह.

महात्मा गांधी यांनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला होता. हा सत्याग्रह सविनय कायदेभंग चळवळीचा एक महत्वपूर्ण भाग होता. या सत्याग्रहाचे लोन बागलाणपर्यंत येऊन पोहोचले. कारण मिठाच्या सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी सटाणा व नामपुर येथील एक तुकडी निघाली होती यामध्ये बागलाणमधील सुमंत बाबा, डॉक्टर भुतेकर, वामनराव कुलकर्णी आणि धर्मा पाटील, सोनू हर्षद इत्यादींनी सहभाग घेतला होता. ब्रिटिश सरकारने त्यांना पकडले आणि जेलमध्ये टाकले याच काळात ब्रिटिशांनी बागलाणच्या इतर भागातही मोठ्या प्रमाणात अटक सत्र सुरू केले त्यामध्ये सजन राघो पाटील (टेंभे), शंकर बाबाजी पोतदार, देवचंद पाटील (सोमपूर) यांनाही अटक झाली. अशा प्रकारे बागलाण तालुक्यातील सुमारे दीडशे सत्याग्रहींना ब्रिटिशांनी पकडले होते.

या चळवळीचे हे उग्र स्वरूप पाहून महाराष्ट्र कॉंग्रेसने आदेश काढून या चळवळींना स्थगिती करण्यात आल्यात. जंगल सत्याग्रह आणि मिठाचा सत्याग्रह या दोन चळवळीच्या माध्यमातून सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली होती या दोन्ही चळवळींचा परिणाम बागलाणच्या परिसरातील जनतेमध्ये स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रेरणादायी ठरले. सविनय कायदेभंग चळवळीतील बागलाणचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण ठरते. देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी केलेला हा मोठा प्रयत्न होता.

संदर्भ सूची :-


1. प्रा.शं.क.कापडणीस, बागलाणचे इतिहास दर्शन, प्रकाशन काळ १९९९, पृष्ठ क्रमांक १२९ ते १३३

2. दिशा दिपक गायकवाड, आदिवासी चळवळ सुरु व दिशा, सुगावा प्रकाशन पुणे, पृष्ठ क्रं. १५
3. इंटरनेट

# भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील बाबा नरहर गोपाल शेठ यांची योगदान

पवार मंगेश एकनाथ तृतीय वर्ष कला

बागलांचे बाबा या नावाने ओळखले जाणारे नरहर गोपाळशेठ हे नामपुर गावातील एक प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक म्हणून ओळखले जातात त्यांचा जन्म एका वाणी कुटुंबात झालेला होता त्यांच्या घरात परंपरेने चालत आलेल्या रूढींना झुगारून आपल्या व्यवसाया पलीकडे पाहणारे एक स्वातंत्र्य सैनिक होत.

याच काळात भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात महात्मा गांधी यांचे युग सुरू झाले होते. महात्मा गांधी यांनी  खेड्यापाड्यातील जनतेला भारतीय स्वातंत्र्यसंग्रामा बद्दल जागृत करण्याचे काम करीत होते. महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित होऊन बाबा नरहर गोपाल सेठ यांनी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. बाबा नरहर गोपाळशेठ यांना लहानपणापासूनच देशभक्तीचे बाळकडू त्यांच्या वडिलांकडून मिळाले होते. त्यांना भारताच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध लढणाऱ्या भारतीय काँग्रेस विषयी विशेष आकर्षण होते. त्यांना काँग्रेसची विचारधारा व लोका विषयी विशेष प्रेम होते. त्यांनी याच काळात सुरत येथे झालेल्या 1909 च्या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला होता. बाबा नगर गोपाल सेठ यांना स्वदेशी स्वधर्म स्वभाषा यांच्या विषयी विशेष अभिमान होता. भारतातील सत्याग्रह विषयी त्यांच्या मनात चिड निर्माण होत होती. याचबरोबर भारतात होणाऱ्या परकीय मालाची आयात यामुळे देशाची शोषण होते. आपला हिंदुस्तान गरीब होतो म्हणून त्यांनी परकीय मालावर बहिष्कार टाकला जन्मांचा सर्वसामान्य गरीब जनतेत त्यांनी भारतीय स्वातंत्र्याची माहिती पटवून सांगितली परदेशी बालावरील बहिष्कार त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. परदेशी कपड्यांची होळी केली. खादीचे कपडे वापरायला त्यांनी सुरुवात केली. त्यांनी पुढील आयुष्यभर खादीच्या कपडे शिवाय कोणतेही कापड वापरले नाही. या चळवळीची सुरुवात त्यांनी आपल्या

वाड्यापासून सुरुवात केली. त्यांनी स्वातंत्र्य स्वतःसाठी चरखा आणून सूत काढायला सुरुवात केली आपण स्वतः स्वावलंबी व्हावे असा आदर्श त्यांनी इतरांसमोर ठेवला. त्याचबरोबर त्यांनी इतरांनाही चर्के चालवण्यासाठी प्रवृत्त केले. बाबांनी आपल्या वाड्यात सूत उत्पादनाचे तसेच खादी उत्पादनाचे केंद्र काढले नामपुर येथे त्यांनी स्वतःचे दुकान उघडून खादीच्या कपड्यांचे भंडार सुरू केले.स्वदेशी उद्योगाला चालना देण्याचे काम त्यांनी आपल्या वाड्यापासून सुरू केले.

बाबा नरहर गोपाळ सेठ हे लोकमान्य टिळकांच्या विचाराने ही प्रभावी झालेले होते. लोकमान्य टिळकानी  नामपूर येथे भेट दिली होती. बाबांनी टिळकांची नामपुर गावात भव्य मिरवणूक काढली होती तसेच एक जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला आजूबाजूच्या खेड्यातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.  या सभेतून लोकांना भारतीय स्वातंत्र्याविषयी जागृत केले. याच काळा बाबांचा वाडा हा स्वातंत्र्य सैनिकांचा राहण्यासाठी अत्यंत विश्वासाचे ठिकाण होते भूमिगत राहणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना अत्यंत विश्वासाची एकमेव ठिकाण म्हणजेच बाबांचा वाडा होता. आजूबाजूच्या जनतेला मार्गदर्शन करण्यासाठी येणारी स्वातंत्र्य सैनिक व कार्यकर्ते याच वाड्यात राहत असत. बाबानी भूमिगत राहणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना आश्रय देण्याबरोबरच एखाद्या स्वातंत्र्य सैनिकाचे अटक झाली तर त्यांना सोडवण्याची कामही बाबा करत असत.

भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम निर्माण व्हावे राष्ट्रीय विचार निर्माण करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय शाळा सुरू करण्यात येत होत्या. या शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशभक्ती तयार होत होती. बागलांचे बाबा नरहर गोपाळशेठ यांनी राष्ट्रीय पाठशाळा काढण्यास आर्थिक मदत केली. भारतीय विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाची भावना निर्माण व्हावी असे त्यांना वाटत होते .त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शाळेत जाण्यासाठी सहकार्य केले तसेच आर्थिक सहकार्य केले. त्याबरोबर याच काळात बागलाणात जंगल सत्याग्रह

सारावाडी विरुद्ध चळवळ सुरू झाली होती.त्यांचे नेतृत्व करण्यात बाबा अग्रेसर होते. या चळवळीला त्यांनी ग्रामसेवक कार्याची जोड देऊन चळवळ अधिक बळकट करण्याचे काम केले.

बागलांचे बाबा हे महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित झालेले व्यक्तिमत्व होते गादीवादी विचाराचे व भारतीय स्वातंत्र सैनिकांचा त्यांनी सहभाग नोंदवला होता. बागलानात १९२८ मध्ये झालेल्या सारावाडीची चळवळ १९३० मधील कायद्याची चळवळ १९३२मध्ये झालेली आंदोलन अशा सर्व आंदोलनात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. याचबरोबर महात्मा गांधींच्या १९४२ च्या चळवळी त्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला होता तसेच या चळवळीत सहभागी स्वातंत्र्य सैनिकांना त्यांनी मदत केली होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नरहर गोपाळ यांना कारावासाची शिक्षा झाली. असे हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील  स्वातंत्र्यसैनिक बागलांचे बाबा म्हणुन परिचित आहेत.

# बागलाण तालुक्यातील अग्रगण्य स्वातंत्र्य सैनिक कै केशवराव उर्फ गणपत भिका खुटाडे-

खैरनार आकाश जिभाऊ
द्वितीय वर्ष कला



कै केशवराव उर्फ गणपत भिका खुटाडे हे एक अत्यंत करारी व्यक्तिमत्त्व म्हणून बागलाण तालुक्यात सुपरिचितखुटाडे हे लाडशाखीय . हा समाज अत्यल्पव्यापार .वाणी समाजातील एक प्रथितयश कुटुंब होय उदिमाच्या माध्यमातून केवळ नासिक धुळे व जळगाव या तीन जिल्ह्यात प्रामुख्याने स्थिर झालेला आहेमूळचा राजस्थान व गुजरात सरहद्दीतून . भटकत श्रमजीवी व्यापाराच्या दृष्टीने स्थिर झालेला हा मूळचा अस्थिर समाज या मातीत राहिला स्थिरावला व येथील लोकजीवनाशी समरस नामपुर सारख्या खेडेगावात स्थिरावलेले हे कुटुंब त्यांचे मूळ .झाला आडनाव अलईहोयनामपुरला त्यांचे वास्तव्य क्षत्रिय समाज असलेल्या . खत्री गल्लीत होते ज्या ठिकाणी हातमागाचा व्यवसाय सुरू केलेला होता व अशा गल्लीत हे कुटुंब वाढले व लोकांनीच त्यांना . होते "खुंट" दारापुढे कै केशव गणपत खुटाडे यांना दोन भा .खुटाडे हे नामनिधान दिलेत्यांची त्यांची नावे कै महादू व कै बकाराम होयया सर्वांनी निष्ठापूर्वक कष्ट . करून खुटाडे कुटुंबाला श्रीमंती प्रदान करून देण्याचे काम केले व आपली श्रीमंती राष्ट्रहितासाठी उपयोगी पडावी हा राष्ट्रीय दृष्टिकोन त्यांनी नव्या काळानुरूप वागण्याची दृष्टी त्यांच्याकडे .जोपासला होती कुठल्याही

दळणवळणाची बाजारपेठाची उपलब्धता नसताना सुद्धा नामपुर सारख्या खेडेगावात १९४३ साली खुटाडे ऑइल मिल व क्रशिंग फॅक्टरी हे उद्योग कै गणपत खटाडे यांनी आपली मुले कै नारायण खुटाडे कै मुरलीधर खुटाडे कै रामचंद्र तथा बापूराव यांच्यामार्फत सुरू के .त्यांनी भारत मातेला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी इंग्रजांविरुद्ध बंड सुरू केले . १९२८ साली बागलाण व मालेगाव तालुक्यात ३३% सारा वाढ झाली त्या विरोधीच्या चळवळीत केशवराव यांनी वडील मुलगा कै नारायण तथा अण्णासाहेब खुटाडे यांच्यासह सहभागी झाले व सारावड चळवळ जोमाने पुढे सरकारी म्हणून शंकरराव देव ,काकासाहेब गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, बाळासाहेब खेर, मोरारजीभाई देसाई , कर्मवीर भाऊसाहेब हिरे , गोविंदराव देशपांडे, डॉखाडिलकर ., वामराठे या सर्व कार्यकर्त्यांना .ज. त्य .त्या काळात खुटाडे कुटुंबाने आश्रय देऊन मद ा ंच्या या सर्व कार्यात नामपुर परिसरातील अनेक स्वातंत्र्य सैनिक कै नरहर गोपाळ सजन राघो यांच्यासारख्यांचा सहभाग होताराष्ट्रभक्त खुटाडे परिवाराने स्वातंत्र्य . कै केशवशेठ खुटाडे व .आंदोलनाची मशाल आपल्या हाती घेतली होती त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव अण्णासाहेब तथा नारायण खुटाडे हे बागलाण तालुक्यातील स्वातंत्र आंदोलनाच्या चळवळीचे नेतृत्व करीत होते १९३० च्या मीठ सत्याग्रहात त्यांनी सश्रम करावास भोगला स्वातंत्र्य चळवळीचा काळ हा भारावलेला काळ होताव्यक्तीपेक्षा राष्ट्रश्रेष्ठ हा विचार ठासून . त्यांच्या हृदयात भरलेला होताखुटाडे कुटुंब सावकार होते परंतु त्यांची नाळ ही राष्ट्रीयत्वाची जोडलेली होती व राष्ट्रीयत्व रक्तात भिणलेले होते म्हणून त्यांनी आपले श्रीमंती राष्ट्रीय आंदोलनात भाग घेणाऱ्या साऱ्याच स्वातंत्र्यसैनिकांना त्यांनी उपलब्ध करून दिली .1930 च्या जंगल सत्याग्रह काळात ते नामपुर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते .1932 च्या महात्मा गांधीजींच्या परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याच्या आव्हानास प्रतिसाद देऊन त्यांनी आयुष्यभर खादीचे कपडे वापरले नियमितपणे सूतकताईस सुरुवात केली .१९४२ च्या चलेजाव आंदोलनात कै दादासाहेब बिडकर कै दादासाहेब पोतनीस डॉभुतेकर वामनराव यार्दी कै नरहरी गोपाल यांचे .

बरोबर.खुटाडे कुटुंब हे धार्मिक वृत्तीचे .केशवराव सहभागी झाले होते असूनही त्यांनी रुढी आंधळेपणाने कधीच स्वीकारल्या नाहीत त्यांनी आंबेडकर सावरकर व आगरकर यांना अभिप्रेत असलेल्या समरस समाज जीवनासाठी ते सदैव कार्यरत राहिलेजे चांगले त्याचा अभिमान जे . कालबाह्य त्याचा त्याग व देह चंद्र सरकार भिजवण्याची वृत्ती यामुळे ते कमालीचे अनुकरणीय

# बागलांची प्रेरणा बागलाणरत्न स्वातंत्र्य सैनिक कै. फुला शिवराम कापडणीस

**अक्षय काकडे द्वितीय वर्ष कला**




स्वातंत्र्याला आज पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत, अर्थात “आजादी का अमृत महोत्सव” संपूर्ण देशात साजरा होत आहे. इंग्रजांच्या दीडशे वर्षाच्या जुलमी राजवटीचा अंत होत. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांनी भारतवर आपली सत्ता प्रस्थापित केल्यापासून स्वातंत्र्य मिळेपर्यंत अनेक स्वातंत्र्य सेनानींनी देशांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शहीद झाले होते.

भगतसिंह, राजगुरू, चंद्रशेखर आजाद आणि मंगल पांडे असे अनेक कितीतरी स्वातंत्र्यसैनिक होते, जे आपल्या तरुण वयातच देशासाठी प्राण्यांची आहुती दिली. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी देशभरात इंग्रजांविरुद्ध तीव्र लढा सुरू केला होता. विविधतेने नटलेल्या भारत देश विविध राज्यात विखुरलेला होता. त्यात महाराष्ट्र हे देशातील प्रमुख राज्य होय. महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगलांच्या जुलमी साम्राज्यापासून महाराष्ट्राला मुक्त करत “हिंदवी स्वराज्याची” स्थापना केली होती. तोच आदर्श घेत महाराष्ट्र देखील इंग्रजांविरोधात तीव्र आंदोलन छेडले गेले. त्याचे पडसाद ग्रामीण महाराष्ट्रात उमटताना दिसतात.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुका स्वातंत्र्यलढ्यात अग्रस्थानी होता. अनेक युवकांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. बागलाण तालुक्यातील टेंबे येथील स्वातंत्र्यसैनिक फुला शिवराम कापडणीस आघाडीवर होते. बागलाण तालुक्यातील शेतकरी कुटुंबात फुला कापडणीस यांचा जन्म

झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिवराम ऊखा कापडणीस आईचे नाव सावित्रीबाई कापडणीस असे होते. हे कुटुंब गावातील एक प्रतिष्ठित कुटुंब होते. प्रगतिशील शेतकरी म्हणून त्यांची ख्याती होती. फुला शिवराम कापडणीस हे त्यांचे एकुलते एक चिरंजीव होते. त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते. मात्र मुळातच कुशाग्र बुद्धिमत्ता आणि अंगी चंचलता असल्याने लहानपणापासूनच प्रत्येक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात ते अग्रेसर असत.

तात्कालीन परिस्थितीत इंग्रजांविरुद्ध ज्येष्ठ नेत्यांनी इंग्रजांनी विरुद्ध चळवळ उभी केली होती. ऐन तारुण्यातील कै. फुला कापडणीस यांनी यावेळी स्वातंत्र्याच्या चळवळीत उडी घेतली. परिसरातील नागरिकांना व युवकांना एकत्रित करून इंग्रजांच्या अन्याय अत्याचारा विरोधात जनजागृती करीत, स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर असलेल्या देशभक्तांच्या समूहात ते सहभागी झाले. त्यावेळी इंग्रजांच्या पोलिसांचा ससेमीरा त्यांच्या मागे लागला होता. मात्र मुळातच अंगी चंचलता व कुशाग्र बुद्धिमत्ता असलेले युवा फुला कापडणीस हे पोलिसांना गुंगी देऊन पसार झाले होते. जाज्वल देशभक्तीने प्रेरित होऊन स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी झालेले फुला कापडणीस हे महिने नऊ महिने घरदार सोडून रानावनात फिरत असत आणि ध्येय एकच होते स्वातंत्र्य इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. याच भावनेने प्रेरित होऊन त्यांचे कार्य सुरू होते. त्यांच्या या कार्यात त्यांच्या कुटुंबाचा हि पाठिंबा महत्त्वाचा होता. म्हणूनच ते निस्वार्थीपणे वेगळ्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यात योगदान देत होते. मात्र एके दिवशी घात झाला. तालुक्यातील गोराणे येथे आपल्या सहकारी मित्रासोबत स्वातंत्र्य चळवळीची दिशा ठरवून जनजागृती करत असताना इंग्रजांच्या जुलमी पोलिसांनी अचानक छापा टाकून त्यांना अटक केली. तत्कालीन धुळे येथील जिल्हा मध्यवर्ती कारागृह त्यांची रवानगी करण्यात आली. मात्र येथे देखील त्यांनी इंग्रजांच्या दर्शविरोधात बंड पुकारून स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी देशभक्तांना पुरेशे आणि चांगले जेवण मिळाले पाहिजे यासाठी लढा दिला होता. त्यांच्या

या आक्रमक भूमिकेमुळे इंग्रजांच्या जेलरला झुकावे लागले. आणि परिणाम स्वरूप स्वातंत्र्याच्या चळवळीतील देशभक्तांना चांगल्या प्रतीचे जेवण देण्यात आले. अशा प्रकारे अनेक कार्य फुला कापडणीस यांनी केले होते.

कै. फुला दादांना एक मुलगा होता. त्याचे नाव खंडू कापडणीस होय. त्यांचा विवाह तालुक्यातील खेरमाणी येथील श्री. श्रावण वाळू भदाणे यांची कन्या कौशल्याबाई यांच्याशी झाला होता. त्यांना दोन मुले होती. मुलगा आणि मुलगी यांच्या समावेत फुला दादांच्या आशीर्वादाने संसार सुरू असताना खंडू कापडणीस यांचे अकाली निधन झाले. मात्र एकुलता एक मुलाचा मृत्यू झाल्यानंतर स्वातंत्र्यसैनिक फुलादादा खचून न जाता आपली सून आणि नातवांना सांभाळत संसाराची विस्कळीत झालेली घडी पुन्हा व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांनी दिलेली शिकवण सून कौशल्या व नातू महेंद्र यांनी पाळली. महेंद्र प्रगतिशील शेतकरी म्हणून सुखी संसार करत आहे. त्यांचे नातू इंदिरा आईचे पतीदेव सेवानिवृत्त भारतीय सैनिक आहेत व त्यांचा संसार सुरळीत सुरू आहे. अशा प्रकारे देशाला स्वातंत्र्य मिळवून ७५ वर्ष होत आहेत. आणि स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना देशासाठी ज्यांनी बलिदान दिले त्या अमर हुतात्म्यानच्या पावन स्मृतींना उजाळा मिळावा. म्हणून हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा लेख लिहिण्याचा प्रयत्न केला.

# गंगाधर गणपत खुटाडे

कु.योगिता रवींद्र तृतीय वर्ष कला



कै गंगाधर गणपत खुटाडे यांचा जन्म १ एप्रिल १९२७ रोजी नामपुर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण वडनेव व झोडगे ता. मालेगाव जि. नाशिक येथे झाले. न्यू इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. बेदरकर गुरुजी यांचा त्यांच्यावर मोठा पगडा होता. आबांनी शैक्षणिक जीवनावर ग्रंथालयात जावे तेथील अनेक ग्रंथ अभ्यासावेत त्यातून आपली वाणी एका सरस्वती पुत्रासारखे करावी व समाजाच्या चरणी समर्पित करावी ही त्यांची इच्छा होती. आपले लेखन समृद्ध करावे अशी त्यांची इच्छा होती.स्वातंत्र्य संग्रामात सहभागी होण्याचे बाळकडू घरातून मिळाल्यामुळे ते विद्यार्थी दशेत असतानाच स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाले.

विद्यार्थी दशत असताना गंगाधर गणपत यांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. साने गुरुजी स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात नामपुर येथे भूमिकत असताना राष्ट्रीय सेवा दलात स्वयंसेवक म्हणून त्यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर १९४२ साली नामपुर येथील शासकीय डाक बंगला आंदोलनात विद्यार्थी दशेत असताना त्यांनी सहभाग नोंदवला. ब्रिटिश सरकारने त्यांना अटक केली. पक्ष प्रचार व बुलेटीन वाटप हे भूमिगत कार्य केले. भूमिगत स्वातंत्र्य सेनानींना व नामवंत स्वातंत्र्य सैनिकांना खटाळे कुटुंबीयांचा आश्रय होता .आबासाहेब नामपुर गावाचे काही काळ

ग्रामपंचायतीचे सरपंच होते. त्याच्या काळात नामपुर गावचा विकास घडवून आला. आबांनी नाशिक जिल्हा ग्रंथालय ग्रामपंचायतीचा आदर्श ग्रामपंचायत म्हणून गौरव झाला. स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला व घर ग्रंथालय ही संकल्पना त्यांनी प्रथम मांडली. १९६२ रोजी आबासाहेब जिल्हा परिषदेमध्ये निवडून आले. त्या वेळेच्या कॉंग्रेस पक्षाचे ते पक्षप्रतोब होते. आबांचे व्यक्तिमत्व हे स्पष्ट वक्तव्यामुळे स्वच्छ सुंदर व निष्कलंक राहिले आहे. त्यांची लोकप्रियता ही कधी कमी झाली नाही. बागलाण तालुक्याच्या राजकारणात आबा कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे बागलान तालुका कॉंग्रेसचे पंधरा वर्षे अध्यक्ष होते. आबासाहेब हे नाशिक जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार होते. १९५० च्या जवळपास दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्राचे आबा वार्ताहर होते. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात नारायण खुटाडे यांची योगदान महत्वपूर्ण आहे. एक अत्यंत रुबाबदार कुठलीही गोष्ट करायची करायला घेतली की ती ते तडीस नेत असे. धाडसी व करारी हे गुण त्यांचे स्थायू उपजत होते. आयुष्यात अनेक गंभीर आजारांना त्यांना तोंड द्यावे लागले परंतु त्यांनी कधीही हार मानली नाही. १९४८ मध्ये वडिलांच्या निधनानंतर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी नारायण खोटाडे यांच्यावर होती.त्यांनी  उत्तम कुटुंब प्रमुख म्हणून आपली भूमिका बजावली. सुरुवातीच्या काळात विविध वस्तू भांडार या नावाने दुकान नारायणराव चालवत होते. सुरुवातीला  त्यांनी त्यांचे वडील केशवरावची जडणघडणीत त्यांची प्रमुख हिस्सा होता. याच काळात गणपत खुटाळे यांच्याबरोबर अनेक स्वातंत्र्य चळवळींमध्ये सहभाग घेतलेला दिसून येतो. १९३०साली चराई सत्याग्रहासाठी बागलाण तालुक्यातील एक पथक नारायण खुटाडे यांच्या नेतृत्वाखाली विलेपार्ले येथे गेले होते. त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक झाली व बेळगावच्या तुरुंगात त्यांना तीन महिने कारावासाची शिक्षा भोगावी  लागली. नारायण कोठाडे हे बागलाण तालुक्यातील स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीचे नेतृत्व करीत होते. १९३० आंदोलनात नारायणराव यांनी सुद्धा सहभाग नोंदवला १९५९ साली आपले वडिलोपार्जित दुकान जळाले तेव्हा त्यांनी आपल्या कुटुंबीयांना म्हटले की

हतबल होऊन रडत बसू नका रावणाची सुद्धा लंका सोन्याची होती ती पण जळाली असा सल्ला दिला. सैनिक म्हणून त्यांचा उल्लेख करण्यापेक्षा ते एक उत्तम स्वातंत्र्य सैनिक गांधीवादी विचारसरणीचे होते. लाडशाकीय वाणी समाजाचे अखिल भारतीय अध्यक्ष झाले. कुटुंबप्रमुख होते. व्यक्तिमत्व केवळ प्रकृतीमध्ये शारीरिक दृष्टीने दुर्बल झाले अन्यथा कुठल्याही संकटांना न घाबरणारा हा या घराण्याचा महामेरू या कुटुंबाचा पंचप्राण होता. सण १९६९ रोजी नारायणराव यांची प्राणज्योत मालवली.

# मुरलीधर लक्ष्मण बिरारी यांचे समाजकार्य व स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

कुं.अनिता अहिरे तृतीय वर्ष बी.ए.

स्वातंत्र्यवीर मुरलीधर लक्ष्मण बिरारी यांचा जन्म १८ मे १९६५ साली झाला.त्यांच्या वडिलांचे नाव लक्ष्मण शेठ असे होते तर आईचे नाव तुळसाबाई असे होते मुरलीधर यांना दोन भाऊ होते. रघुनाथ तात्या आणि जगन्नाथ तात्या असे त्यांच्या भावांचे नाव होते मुरलीधर यांना सर्वजण बाबा या टोपण नावाने हाक मारत असत मुरलीधर यांचा विवाह बहादुरपूर येथील लोटन सेट पांडू बोरसे यांची लाडकी कन्या गंगुबाई यांच्याशी झाला. वैवाहिक जीवन जगत असताना त्यांच्या वडिलांचे म्हणजेच लक्ष्मण बिरारी यांचा मृत्यू झाला. त्यामुळे कुटुंबातील सर्व जबाबदारी ही बाबांवर आली होती बाबांनी ती जबाबदारी पार पाडली हे सर्व करत असताना त्यांनी समाजकार्य करण्याचे ठरवले बाबांनी पुढे एक संकल्प केला की कुटुंब किंवा माझे घर हे विश्वही संकल्पना मर्यादित न ठेवता आपण ज्या समाजात मायभूमी देशात जन्माला आलेलो आहोत त्यांचे आपण काहीतरी देणे लागतो या उद्देशाने बाबा समाजकार्याला लागले.

समाजकार्याची सुरुवात आसखेडा गावातूनच केली. गावकल्याणासाठी त्यांनी सरपंच म्हणून निवड केली व त्यांनी सलग सोळा वर्षे सरपंच म्हणून काम सांभाळले व त्यांचा गावाच्या विकासात मोलाचा वाटा होता.गावात रस्ते मंदिरे मोसम नदीवरील दगडी घाट त्याचबरोबर १९४८ साली बाबांनी आसखेडा गावात बस सेवा सुरू केली. त्यामुळे दळणवळणाची सेवा सुरू झाली. बाबांचं काम हे समाजकार्यापर्यंत थांबत नाही तर ते पुढे कीर्तनाच्या आणि भजनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करत असतानाच त्यांची प्रतिमा शक्ती जागृत झाली आणि त्यातूनच काव्य लेखनाला सुरुवात झाली. त्यांनी काकड आरती आणि श्रीकृष्णाची आरती देखील लिहिली त्यांच्या या सहज सुलभ काव्य लेखनाच्या छंदामुळे ते घोडकवी म्हणून ओळखले जाऊ लागले जीवनाचे बारीक बारीक रंगांचे

दर्शन घडवणारी त्यांची कविता व मनाला स्पर्श जाणवणारी त्यांची २४० पेक्षा जास्त काव्य लेखन झालेले आहे. काव्याच्या माध्यमातून समाजाला एक उपदेश केला आहे दरबारी त्यांच्या म्हणे सर्वांसाठी त्यास आहे माणसात देव नाही म्हणतात मग दगडात काय बाबांना कर्मकांड अंधश्रद्धेवर विश्वास नव्हता मनुष्य प्राण्यातच देव पाहण्यात त्यांची हेतू होता. त्यांच्या मतानुसार मानवधर्म हाच खरा धर्म आहे.

समाज कार्य करत असतानाच त्यांच्या मनात देश कार्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे म्हणून बाबांनी जननी व जन्मभूमी यांना सर्वश्रेष्ठ स्थानी मानून बाबांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली.इ.स.१९३० मध्ये बाबांनी महात्मा गांधींच्या जीवनावर गाणी लिहून त्यांच्याप्रती गावोगावी जाऊन वाटल्या आणि ब्रिटिशांच्या विरोधात प्रतिभेच्या जोरावर जनतेच्या मनामध्ये जनजागृतीचे काम करत असताना ब्रिटिशांनी बाबांना पकडून त्यांच्या काव्याच्या प्रति जप्त करून त्यांना पुण्याच्या येरवडा तुरुंगात चार महिन्याची शिक्षा ठोठावली. शिक्षा बघून परत आल्यानंतर त्यांनी देशसेवेचे कार्य अविरत सुरू ठेवले. अशा या थोर स्वातंत्र्यसैनिकाचा मृत्यू ९ जून १९७८ साली झाला. त्यांचे साहित्य कार्य विचार आजही अजरामर आहेत.

प्रा केशव चंदू गावित मराठी विभाग सुनील तेजला वसावे मराठी विभाग भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील बाबा नरहर गोपाल शेठ यांची योगदान बागलांचे बाबा या नावाने ओळखले जाणारे नरहर गोपाळशेठ हे नामपुर गावातील एक प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक म्हणून ओळखले जातात त्यांचा जन्म एका वाणी कुटुंबात झालेला होता त्यांच्या घरात परंपरेने चालत आलेल्या रूढींना झुगारून आपल्या व्यवसाया पलीकडे पाहणारे एक स्वातंत्र्य सैनिक होते.

# बागलांचे बाबा स्वातंत्र्यलढ्यातील समर्पित व्यक्तीमत्त्व

कु.सारिका अहिरे
टी वाय बी ए इतिहास

बागलांचे सुपुत्र देशभक्त राष्ट्र प्रेमी क्रांतिवीर अर्थात आपले बागलांचे बाबा म्हणून प्रसिद्ध असलेले नरहर गोपाळशेठ अलई बागलाणच्या त्या काळातील एक छोटेसे गाव नामपुर ही त्यांची कर्मभूमी त्या काळात तुलनेने सदन कुटुंबात बाबांचा जन्म झाला.

अलई कुटुंब तसे भाविक व भक्तीची परंपरा असलेले कुटुंब आर्थिकदृष्ट्या सदन असलेल्या या कुटुंबाकडे ईश्वर समाज राष्ट्र इत्यादी विषयी श्रद्धा, प्रेम व निष्ठा आपल्याला बघायला मिळते. बाबा नरहर सेठ यांचे वडील गोपाळशेठ पिढी जात जमीनदार सावकार पण अत्यंत भाविक व विठ्ठल भक्त म्हणून नामपुर गावातच नाही तर पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. त्यांचाच संस्काराचा विचाराचा वारसा आपल्याला नरहरी सेट यांच्यात बघायला मिळतो. त्या काळातील एकत्रित कुटुंब पद्धतीप्रमाणे बाबांचे कुटुंब तसे मोठे कुटुंब होते. बाबा कुटुंब प्रमुख असून सुद्धा बाबांनी परिवारातील सर्वांना सन्मानाने भागवत कुटुंबातील जबाबदारी व अधिकार यांचे विभाजन केले होते. मोसम परिसरातील श्रीमंत कुटुंब म्हणून बाबांच्या परिवाराची गणना होती. सुप्रसिद्ध काशीद क्षेत्राच्या वाटेवरही त्यांच्या जमिनी होत्या बाबांचे घरातील व बाह्य जबाबदारीमुळे फारसे शिक्षण झाले नाही. पण तल्लक बुद्धिमत्ता असलेल्या बाबांना गणिताच्या जमाखर्चाचा चांगलाच अभ्यास होता. बाबा त्या काळातील स्त्री पुरुष समानतेचा विचार करणारे होते. म्हणून आपली मुलगी लक्ष्मीबाई हिला परिसरात शिक्षणाची सुविधा व वातावरण नसल्याने नाशिकला शिक्षणासाठी पाठवले.

बाबांचा स्वभाव अतिशय धार्मिक संवेदनशील पराक्रमी परोपकारी मनमिळाऊ व मानवतावादी होता. आर्थिक आध्यात्मिक समाजसेवा मूल्यांचे संस्कार कुटुंबातूनच रुजल्याने समाजात वावरत असताना बाबा सर्व प्रकारच्या प्रलोभने प्रसिद्धी दोष विकारापासून दूर होते. असे मूल्यात्मक संस्काराच्या वाटेवर चालणारा समाज जीवनात वावरताना

बाबांच्या मनात स्वातंत्र्यप्राप्ती राष्ट्रभक्ती राष्ट्राबद्दल प्रामाणिक निष्ठा होती. स्वातंत्र्यलढ्यात तत्कालीन क्रांतिवीरांनी स्वातंत्र्य सेनानींनी वेळोवेळी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जे आंदोलने सत्याग्रह केलेत. त्यांचा प्रभाव मनावर पडणे स्वाभाविक होते बाळ गंगाधर टिळक यांची स्वातंत्र्य प्राप्त स्वातंत्र्य आंदोलनासाठी केलेले आंदोलन भाषण तसेच महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली असहकार चळवळ सविनय कायदेभंग चळवळ चलेजाव आंदोलन तसेच तत्कालीन राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांपासून जिल्हास्तरावर नेतृत्व करणाऱ्या नेत्यांपर्यंत ज्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चळबळी उभ्या राहिल्या. त्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला त्या काळातील जे राष्ट्रभक्त नेते होते त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव बाबांवर पडला होता त्याचाच प्रभाव व परिणाम आपल्या बागलांमध्ये सुद्धा बघायला मिळतो.

